शासकीय सेवांमधील भरतीबाबतच्या जाहिरातीतून मागासवर्गीयांसाठी असलेल्या राखीव जागांचा उल्लेख करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग.
परिपत्रक क्रमांक बी.सी.सी. १०६७-१२८२७-११००-ज.
सचिवालय, मुंबई-३२(बीआर), दिनांक १ मार्च १९६८.

प रि प त्र क

शासकीय सेवांमध्ये मागासवर्गीयांसाठी ठेवावयाच्या राखीव जागांबाबतचे आदेश काटेकोरपणे पाळले जाणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने दिनांक २९ मार्च १९५४ ला राजकीय व सेवा विभागाच्या क्रमांक-बी.ए.सी.१२५१-च्या परिपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आदेशांनुसार सर्व भरती करणा-या प्राधिका-यांनी भरती करताना मागासवर्गीयांसाठी असलेल्या राखीव जागांची गणती करणे आवश्यक आहे व भरतीविषयक जाहिरात देण्यात यावयाची असल्यास तीमध्ये अशा राखीव जागांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की अनेकदा या आदेशांचे पालन न करता जाहिराती देण्यात येतात व त्यामध्ये राखीव जागांचा उल्लेख नसतो. यास्तव या परिपत्रकाद्वारे सर्व सचिवालयीन विभाग व त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांस असे कळविण्यात येत आहे की त्यांनी यापुढे दिनांक २९ मार्च १९५४ च्या उल्लेखित आदेशांची सक्त अंमलबजावणी करावी. याबाबतची जबाबदारी प्रत्येक विभाग/कार्यालय यातील एका विशिष्ट अधिका-यावर सोपविण्यात यावी व संदर्भाधीन

मागे पहा.

शा.म.मु.रोटा-एच-१४२२(७०००-३-६८)

आदेशांतील सूचनेनुसार अंमलबजावणीच्या बाबतीत काही हयगय झाल्यास त्याबाबत त्या अधिका-यास जबाबदार धरण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

शि.मा.लक्षाणे,
अवर सचिव,महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

प्रति-

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री व उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सचिवालयीन विभागांच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील सर्व विभागाधिकारी व कार्यालयप्रमुख,
शिक्षण व समाज कल्याण विभाग,
इतर सर्व सचिवालयीन विभाग.

*पत्राने.